# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | | Website : http://maha-arogya.gov.in |
| | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१००६ | Email : miscell@rediffmail.com |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर ) | २२६११४७१ | Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६२०२४९ | 022- 22679044(Hosp.) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | 022-22622155(CAO) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | 022-22703785(Control Room) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६७५५ | 022-22621047 (NCD) |
| | | 022-22625799(Procurement Cell) |


क्र.:संआसे/स्वाईन फल्यु/मार्गदर्शक सुचना/कक्ष-६/ /२०१२.

दिनांक : १८-३.२०१२. ३६४-५४२

प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,

जिल्हा रुग्णालय, ...... (सर्व)

जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, जिल्हा ...... (सर्व)

कार्यकारी आरोग्य अधिकारी,

बृहन्मुबई महानगरपालिका, मुंबई

आरोग्य अधिकारी,

महानगरपालिका, ...... (सर्व)

अधिष्ठाता,

वैदयकीय महाविदयालय, ...... (सर्व)

**विषयः-** स्वाईन प-ल्यू प्रतिबंध व नियंत्रण संदर्भातील मार्गदर्शक सुचना.

सध्या पुणे शहरात आणि ग्रामीण भागात स्वाईन प-ल्यूचे काही रुग्ण नव्याने आढळून आले आहेत. पुण्यात स्वाईन प-ल्यूमुळे ३ रुग्णांचा मृत्यु देखील झाला आहे. आंध्रप्रदेश आणि राजस्थान मध्ये देखील स्वाईन प-ल्यू रुग्ण आढळल्याच्या बातम्या आहेत. या पार्श्वभुमीवर आपण सर्वांनी प्रत्येक स्तरावर स्वाईन प-ल्यू सर्वेक्षण प्रतिबंध आणि नियंत्रण उपाय योजना अधिक जोमाने राबविण्याची गरज आहे.

या दृष्टीने आपण आपल्या कार्यक्षेत्रातील विलगीकरण कक्ष, अतिदक्षता विभाग, व्हेन्टीलेटर्स या सर्व पायाभूत सुविधांचा नव्याने आढावा घेऊन या सर्व यंत्रणा कार्यान्वित असल्याची खात्री करुन घ्यावी. तसेच आपल्या कार्यक्षेत्रातील वैदयकीय अधिकारी, खाजगी वैदयकीय व्यावसायिक आणि आरोग्य कर्मचारी यांची विशेष सभा आयोजित करुन सर्वांना स्वाईन फ्ल्यूची ताजी परिस्थिती आणि प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजनांबाबत अवगत करावे. जिल्हास्तरावरील समन्वय अधिक अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीने स्वाईन फ्ल्यू संदर्भात उद्‌भवलेली ताजी परिस्थिती लक्षात घेता खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

- **<u>दैनंदिन सर्वेक्षण:-</u>**

स्वाईन फ्ल्यू साठी 'इन्फ्ल्युएंझा सदृश्य लक्षणे' असणाऱ्या रुग्णांचे दैनंदिन सर्वेक्षण आपल्या कार्यक्षेत्रात सर्व क्षेत्रीय स्तरावर करणे आवश्यक आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही भागात इन्फ्ल्युएंझा सदृश्य लक्षणे असणारे रुग्ण एकवटलेले (cluster) आढळल्यास त्याठिकाणी तातडीने प्रतिबंधात्मक व नियंत्रण उपाय योजना सुरु करणे आवश्यक आहे. तसेच अशा cluster ची माहिती २४ तासांच्या आत विभागीय व राज्यपातळीवर कळविणे बंधनकारक आहे. आपल्या भागात आढळलेल्या cluster मधील काही रुग्णांचे प्रयोगशालेय नमुने राष्ट्रीय विषाणू संस्थान पुणे येथे तातडीने तपासण्यास पाठवावे तसेच योग्य आरोग्य शिक्षण आणि प्रतिबंधात्मक उपयायोजनांव्दारे इन्फ्ल्युएंझा चा फैलाव इतर भागात होणार नाही याची दक्षता घ्यावी.

आरोग्य सेवक, सेविका, आरोग्य पर्यवेक्षक, वैदयकीय अधिकारी यांनी आपापल्या क्षेत्रीय भेटीत शाळा, आश्रमशाळा, वसतीगृहे आणि गरोदरमाता यांच्याकडे या संदर्भात विशेष लक्ष दयावे.

- **<u>निकट सहवासीतांचा शोध व उपचार:-</u>**

स्वाईन फ्ल्यूचा अधिशयन कालावधी हा १ ते ७ दिवसांचा आहे. स्वाईन फ्ल्यू रुग्णांमध्ये लक्षणे आढळून येण्याच्या एक दिवस आधीपासून ते लक्षणे आढळल्यानंतर पुढील ७ दिवसांपर्यन्त स्वाइन फ्ल्यूचा रुग्ण निकट सहवासितांमध्ये संसर्ग संक्रमित करु शकतो. त्यामुळे या कालावधीत स्वाईन फ्ल्यू बाधित रुग्णांच्या प्रत्यक्ष सहवासात आलेल्या निकट सहवासितांचा शोध घेणे आवश्यक आहे.

१) प्रत्येक स्वाईन फ्ल्यू बाधित रुग्णाच्या त्याच्या संसर्ग संक्रमण कालावधीत (Infectious Period) प्रत्यक्ष सहवासात आलेल्या प्रत्येकाचा बारकाईने शोध घेण्यात यावा.

२) ज्या निकट सहवासितांमध्ये इन्फ्ल्युएंझा सदृश्य लक्षणे आढळतील त्यांना तातडीने कॅप्सुल ऑसेलटॅमीवीर (टॅमीफ्ल्यू) उपचारात्मक मात्रेत सुरु करावी.

३) ज्या निकट सहवासितांमध्ये कोणतेही लक्षण नाहीत त्यांचे पुढील १० दिवस बारकाईने निरिक्षण करण्यात यावे .या कालावधीत ज्यांना इन्फ्ल्युएंझा सदृश्य लक्षणे आढळतील त्यांना ऑसेलटॅमीवीर (टॅमीफ्ल्यू) उपचारात्मक मात्रा पूर्ण कालावधीसाठी देण्यात यावी.

४) ज्या निकट सहवासितांमध्ये वरील कालावधीत फ्ल्यू ची लक्षणे आढळणार नाहीत त्यांना ऑसेलटॅमीवीर (टॅमीफ्ल्यू) देण्यात येऊ नये.

- **<u>इन्फ्ल्युएंझा रुग्णांवरील उपचार पध्दती:-</u>**

इन्फ्ल्युएंझा सदृश्य लक्षणे असणाऱ्या रुग्णाना उपचार करणे सोयीचे व्हावे यासाठी यापूर्वीच रुग्णांची वर्गवारी करुन त्यानुसार सर्वांना उपचार देण्याची पध्दती सर्व संबंधितांना कळविण्यात आलेली आहे.

लक्षणांनुसार रुग्णांची वर्गवारी व दयावयाच्या उपचाराचा तपशिल खालील प्रमाणे आहे:-

| वर्गवारी | प्रमुख लक्षणे | स्वॅब घेण्याची आवश्यकता | उपचार |
|---|---|---|---|
| क | सौम्य ताप ( ३८°C पेक्षा कमी) खोकला, घशाला खवखव, अंगदुखी, डोकेदुखी, जुलाब, उलटया | नाही | टॅमी फ्ल्यू सुरु करण्याची गरज नाही. |
| ब | वरील लक्षणांशिवाय तीव्र घसादुखी / घशाला सूज व ताप ३८°C पेक्षा जास्त | निवडक पेशन्टचा स्वॅब घ्यावा. | टॅमी फ्ल्यू सुरु करावा. |
| अ | वरील लक्षणांशिवाय धाप लागणे, छातीत दुखणे, खोकल्यावाटे रक्त पडणे, रक्तदाब कमी होणे, नखे निळसर काळी होणे, मुलांच्यामध्ये चिडचिड आणि झोपाळूपणा | प्रत्येकाचा स्वॅब घेणे आवश्यक | टॅमी फ्ल्यू सुरु करावी. |

वर्ग क मधील रुग्णांना त्यांच्या लक्षणांसाठी नेहमीचा उपचार सुरु करावा. २४ तासानंतर त्यांची पुर्नतपासणी करावी. लक्षणांमध्ये उतार असल्यास चालू आहे तो उपचार सुरु ठेवावा. लक्षणांची तीव्रता वाढली असल्यास टॅमी प-ल्यू सुरु करावी.

वर्ग ब मधील केवळ अति जोखमीच्या व्यक्तींचे (गरोदर माता, उच्चरक्तदाब, मधूमेह, किडनीचे विकार, कर्करोग, दमा असे विकार असणाऱ्या व्यक्ती) स्वॅब घेण्यात यावेत.

रुग्णाच्या वजनानुसार दयावयाच्या टॅमी प-ल्यू मात्रेचा तपशिल खालील प्रमाणे:-

| क्रमांक | वजन | टॅमी प-ल्यूचा डोस |
|---|---|---|
| १ | १५ किलो किंवा १५ किलो पेक्षा कमी | ३० मिलीग्रॅम दिवसातून २ वेळा ५ दिवस. |
| २ | १५ किलो ते २३ किलो | ४५ मिलीग्रॅम दिवसातून २ वेळा ५ दिवस. |
| ३ | २३ किलो ते ४० किलो | ६० मिलीग्रॅम दिवसातून २ वेळा ५ दिवस. |
| ४ | ४० किलो पेक्षा जास्त | ७५ मिलीग्रॅम दिवसातून २ वेळा ५ दिवस. |

बालकांना तसेच गरोदर महिलांमध्ये टॅमी प-ल्यू सुरु करताना विशेषज्ञाचा सल्ला घ्यावा.

- **जनतेस आरोग्य शिक्षण:-**

सध्या आढळून येत असलेल्या स्वाईन प-ल्यू केसेस पाहता सर्वसामान्य जनतेसाठी वैयक्तिक पातळीवरील स्वाईन प-ल्यू प्रतिबंधाच्या महत्त्वपुर्ण उपाय योजना नव्याने सांगणे आवश्यक आहे. विशेषत: खालील संदेश आपल्या कार्यक्षेत्रात वेगवेगळया माध्यमातुन सर्वसामान्य जनतेपर्यन्त पोहचतील याची खबरदारी घ्यावी:-

१. **स्वाईन प-ल्यू टाळण्यासाठी हे करा:-**

- वारंवार साबण व स्वच्छ पाण्याने हात धुवा.
- पौष्टिक आहार घ्या.
- लिंबु, आवळा, मोसंबी, संत्री, हिरव्या पालेभाज्या या सारख्या आरोग्यदायी पदार्थांचा आहारात वापर करा.
- पुरेशी झोप आणि विश्रांती घ्या.
- भरपूर पाणी प्या.

२. स्वाईन फ्ल्यू टाळण्याकरता हे करु नका:-

- हस्तांदोलन
- सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका.
- डॉक्टरांच्या सल्याशिवाय औषध घेऊ नका.
- आपल्याला फ्ल्यू सदृश्य लक्षणे असतील तर गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका.

वरील प्रकारे मार्गदर्शक सूचनांचा सुयोग्य उपयोग करुन स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध व नियंत्रणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

संचालक,
**आरोग्य सेवा, मुंबई**

**प्रत माहितीस्तव सस्नेह :**

- संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव:-**

- उपसंचालक, आरोग्य मंडळ, ....... (सर्व)
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा...... (सर्व)
- जिल्हाधिकारी, जिल्हा........... (सर्व)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**

- मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
- मा.सचिव, वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभाग, मुंबई.
- मा.आयुक्त (कु.क), तथा संचालक, राष्ट्रिय ग्रामिण आरोग्य अभियान, मुंबई.